**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०१**

**जी.सी.सी. मूल्यमापन**

**शिक्षासूची - ( Punishment)**

**परिशिष्ट - अ (Appendix- A)**

**प्राश्निक, छाननीकार, मुद्रित तपासणीस, नियामक यांनी परीक्षेच्या कामात काही चुका केल्यास त्यांचे विरुध्द खाली दिलेल्या तपशीलप्रमाणे कारवाई करण्यात येईल.**

| अ.क्र | चुकांचे स्वरुप (Category) | परीक्षा परिषदेने करावयाची कारवाई( Action to be taken by the M.S.C.E. ) | |
|---|---|---|---|
| | | पुर्वीची शिक्षासुची | प्रस्तावित शिक्षा सुची |
| १ | प्रश्नपत्रिकेच्या मूळ प्रतीमध्ये गंभीर स्वरुपाच्या चुका आढळणे. | परत नियुक्ती करु नये. | संबंधितांची पुन्हा नियुक्ती करु नये. मूळ प्रतीमध्ये चूक आढळल्यास प्रथम छाननीकाराने प्राश्निकांचे निदर्शनास आणून द्यावी.<br>१) छाननीकाराने चुक निदर्शनास आणून देऊनही प्राश्निकाने चुका दुरुस्त न केल्यास प्राश्निकास शिक्षा म्हणून परीक्षेच्या कामावर पुन्हा नियुक्त करु नये. संबंधित परीक्षेचे मानधन अदा करु नये.<br>२) छाननीकाराने प्रश्नपत्रिका तपासल्या नंतरही चुका आढळून आल्यास प्राश्निक व छाननीकाराची पुन्हा नियुक्ती करु नये. तसेच दोघांना मानधन अदा करु नये. |
| २ | समीक्षण केलेल्या उत्तरपत्रिकेत पडताळणीच्या वेळी चुका आढळून येणे. | पुढील ३ परीक्षांच्या कामासाठी नियुक्त करु नये. | पुढील ३ परीक्षांच्या संबंधीत सर्व कामासाठी परीक्षक व समीक्षक यांची नियुक्ती करु नये. |

**शिक्षासूची - ( Punishment)**

**परिशिष्ट - ब (Appendix- B)**

**परीक्षकांनी ( Examiner)/ पडताळणी परीक्षकांनी परीक्षेच्या कामात चुका केल्यास त्यांचेविरुध्द खाली दर्शविल्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.**

| अ.क्र | चुकांचे स्वरुप (Category) | परीक्षा परिषदेने करावयाची कारवाई( Action to be taken by the M.S.C.E. ) | |
|---|---|---|---|
| | | पुर्वीची शिक्षासुची | प्रस्तावित शिक्षा सुची |
| १ | ज्या परीक्षेच्या कामासाठी नियुक्ती झाली आहे. त्या परीक्षेस बसलेल्या जवळच्या नातेवाईकांची माहिती लपवून ठेवणे. | पुढील २ परीक्षांच्या कामासाठी " परीक्षक" म्हणून नियुक्त न करणे. | पुढील २ परीक्षांच्या कामासाठी " परीक्षक"/ समीक्षक म्हणून नियुक्ती करु नये. मानधन अदा करु नये किंवा अदा केल्यास वसूल करावे. |
| २ | तपासलेल्या उत्तरपत्रिकेमध्ये फेरपडताळणी करतांना त्यामध्ये चुका आढळून येणे. | पुढील २ परीक्षांच्या कामासाठी नियुक्त करु नये. | पुढील २ परीक्षांच्या कामासाठी नियुक्ती करु नये परीक्षक व समीक्षक यांचे मानधन अदा करु नये किंवा अदा झाले असल्यास वसूल करणे. |
| ३ | उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावर गुणांची नोंद अथवा गुणयादीवर उतरवितांना चुका करणे अथवा चुकीचे गुण नोंदविणे. | १ चुकीसाठी १ परीक्षा, २ चुकांसाठी २ परीक्षा व ३ किंवा ३ पेक्षा अथवा त्यापेक्षा जास्त परीक्षांच्या कामासाठी नियुक्त करु नये. | पुढील २ परीक्षांच्या कामासाठी नियुक्ती करु नये परीक्षक व समीक्षक यांचे मानधन अदा करु नये किंवा अदा झाले असल्यास वसूल करणे. |
| ४ | गुणांच्या बेरजा चुकविणे, गुणांच्या वर्गीकरण ( Transfarring of marks) चुकीचे करणे इ. हलगर्जीपणा, अनियमितपणा तसेच गुणांच्या चुकीच्या नोंदी करणे अथवा गुण न नोंदविणे. | पुढील ३ परीक्षांसाठी नियुक्त करु नये. | पुढील २ परीक्षांसाठी परिक्षक व समीक्षक दोघांनाही नियुक्त करू नये. मानधन अदा करु नये किंवा अदा झाले असल्यास वसूल करणे. |
| ५ | परिषदेच्या आदेशानुसार सूचनानुसार कार्यवाही न करणे, गुणदान योजनेस अनुसरुन काम न करणे. | पुढील २ परीक्षांसाठी नियुक्त करु नये. | पुढील २ परीक्षांसाठी परीक्षकांची नियुक्ती करु नये. मानधन अदा करु नये. |
| ६ | उत्तरपत्रिका तपासतांना काही प्रश्नांची/ उपप्रश्नांची उत्तरे अथवा उत्तराचा काही भाग न तपासणे अथवा त्या उत्तरास गुणदान न करणे. | पुढील २ परीक्षांसाठी नियुक्त करु नये. | पुढील २ परीक्षांसाठी परीक्षकांची नियुक्ती करु नये. मानधन अदा करु नये. |
| ७ | गुणयाद्या व उत्तरपत्रिका जमा करतांना अक्षम्य विलंब करणे. | पुढील ४ परीक्षांसाठी नियुक्त करु नये. | पुढील २ परीक्षांसाठी परीक्षकांची नियुक्त करु नये. मानधन अदा करु नये. |

## शिक्षासूची - ( Punishment)

## परिशिष्ट - क (Appendix- C)

परीक्षा सुरु असताना अथवा परीक्षेचा निकाल घोषित केल्यानंतर परीक्षार्थी व त्यांचे संबंधितांनी काही गैरप्रकार केल्यास त्यांचे विरुध्द करावयाच्या शास्ती सुची खालीलप्रमाणे :-

| अ.क्र | चुकांचे स्वरुप (Category) | परीक्षा परिषदेने करावयाची कारवाई( Action to be taken by the M.S.C.E. ) | |
|---|---|---|---|
| | | पुर्वीची शिक्षासुची | प्रस्तावित शिक्षा सुची |
| १ | उत्तरपत्रिकेतील पत्र लिहिण्याच्या प्रश्नाच्या उत्तरात अथवा अन्य कोणत्याही उत्तराच्या मसुद्यात विद्यार्थ्याने स्वत:चे नाव लिहिणे | परीक्षार्थ्यास समज (Warning) देणे. परीक्षार्थीची त्या परीक्षेची संपादणूक रद्द करणे. | महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC) टंकलेखन/ लघुलेखन सर्व विषयांकरीता सदर परीक्षांची संपादणूक रद्द करावी. |
| २ | उत्तरपत्रिकेमधून परीक्षकास काही आक्षेपार्ह संकेत/ सूचना करणे. | | |
| ३ | उत्तरपत्रिकेत अनावश्यक/ आक्षेपार्ह मजकूर लिहिणे. | | |
| ४ | उत्तरपत्रिकेत विशिष्ट नाव व पत्ता लिहून परीक्षकास आमिष दाखविणे. | | |
| ५ | उत्तरपत्रिकेस चलनी नोट/ नोटा जोडणे. | परीक्षार्थीची त्या परीक्षेची संपादणूक रद्द व पुढील एका परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करावा. | उमेदवाराची सदर परीक्षेतील संपादणूक रद्द करुन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC) टंकलेखन/ लघुलेखन सर्व विषयांच्या पुढील १ परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करावा. |
| ६ | परीक्षा सुरु असताना अन्य विद्यार्थ्यांशी चर्चा करणे अथवा बोलणे. | संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा हॉलच्या बाहेर काढणे. तत्पूर्वी त्यांचेकडून लेखी हमीपत्र घेणे. संबंधित विद्यार्थ्याची सदर परीक्षेची संपादणूक रद्द करणे. | संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा हॉलच्या बाहेर काढणे. तत्पूर्वी त्यांचेकडून लेखी कबुली जबाब/ हमीपत्र घेणे अथवा त्याबाबतचा पंचनामा करणे. संबंधित विद्यार्थ्यांची सदर परीक्षेची संपादणूक रद्द करणे. |

| अ.क्र | चुकांचे स्वरुप (Category) | परीक्षा परिषदेने करावयाची कारवाई( Action to be taken by the M.S.C.E. ) | |
|---|---|---|---|
| | | पुर्वीची शिक्षासुची | प्रस्तावित शिक्षा सुची |
| ७ | बाहेरुन आणलेली परीक्षेशी संबंधित कागदपत्रे, प्रश्नपत्रिकेतील टंकलेखन केलेले अथवा लिहून आणलेले लघुलेखनाचे उतारे इत्यादी आढळून आल्यास. | संबंधित विद्यार्थ्याचे लेखी म्हणणे ताब्यात घेऊन नंतर तात्काळ परीक्षाहॉलच्या बाहेर घालवून देणे. संबंधित विद्यार्थ्याची चालू परीक्षेची संपादणूक रद्द करणे व पुढील २ परीक्षांना बसण्यापासून त्यांना प्रतिबंध करणे. | संबंधित विद्यार्थ्याचे लेखी म्हणणे घेऊन तात्काळ परीक्षाहॉलच्या बाहेर घालवून देणे. संबंधित विद्यार्थ्याची सदर परीक्षेची संपादणूक रद्द करणे व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC) टंकलेखन/ लघुलेखन सर्व विषयांच्या पुढील दोन परीक्षांना बसण्यापासून विद्यार्थ्यास प्रतिबंध करणे.<br>तसेच संबंधित विद्यार्थ्यावर केंद्रसंचालकांनी FIR दाखल करावा. सदर प्रकरणी पर्यवेक्षक व केंद्रसंचालक यांनी विद्यार्थ्याशी संगनमत केल्याचे चौकशीअंती निष्पन्न झाल्यास पर्यवेक्षक व केंद्रसंचालक यांचेवर सक्षम अधिकाऱ्यामार्फत शिस्तभंगाची कारवाई प्रस्थावित करावी. |
| ८ | दोन अथवा दोनपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी परीक्षाहॉल मधील सर्व विद्यार्थ्यांनी मिळून सामूहिक कॉपी प्रकार केल्याचे निदर्शनास आल्यास. | संबंधित विद्यार्थ्याचे लेखी निवेदन घेऊन त्यांना परीक्षागृहाच्या बाहेर काढून देणे व संबंधित विद्यार्थ्याची चालू परीक्षेची संपादणूक रद्द करणे व पुढील २ वर्षांसाठी त्यांना वंचित करणे. | संबंधित पर्यवेक्षकाचे लेखी निवेदन घेऊन त्यांना परीक्षागृहाच्या बाहेर काढून देणे व संबंधित विद्यार्थ्याची सदर परीक्षेची संपादणूक रद्द करणे व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा सर्व विषयांच्या पुढील २ वर्षांसाठी प्रतिबंध करणे. सदर प्रकरणी पर्यवेक्षकही दोषी असल्यास केंद्रसंचालकांनी पर्यवेक्षकावर गुन्हा दाखल करावा. |
| ९ | एखाद्या विद्यार्थ्याच्या जागी तोतया (Dummy) विद्यार्थी परीक्षा देत असल्याचे निदर्शनास आल्यास. | तोतया विद्यार्थ्याचे लेखी निवेदन घेणे व परीक्षा केंद्रसंचालकाने त्याचेविरुध्द एफ.आय.आर. दाखल करुन तसे परीक्षा परिषदेस तात्काळ कळविणे. ज्याच्या ऐवजी परीक्षा दिली त्या मूळ विद्यार्थ्याची उत्तरपत्रिका जप्त करुन त्याची चालू परीक्षेतील संपादणूक रद्द करणे व पुढील ५ परीक्षांना बसण्यापासून त्यास प्रतिबंध करण्यात येईल. | तोतया विद्यार्थ्याचे लेखी निवेदन घेणे व परीक्षा केंद्रसंचालकाने मूळ विद्यार्थी व तोतया विद्यार्थी या दोघांचे विरुध्द F.I.R दाखल करुन तसे परीक्षा परिषदेस तात्काळ कळविणे.<br>उत्तरपत्रिका जप्त करुन त्याची सदर परीक्षेतील संपादणूक रद्द करणे व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC) टंकलेखन/ लघुलेखन सर्व विषयांच्या पुढील ४ वर्ष बसण्यापासून त्यास प्रतिबंध करावा तसेच पर्यवेक्षक दोषी असल्यास पर्यवेक्षकावर सेवा शर्ती नुसार शिस्तभंगाची कारवाई करावी. |

| अ.क्र | चुकांचे स्वरुप (Category) | परीक्षा परिषदेने करावयाची कारवाई( Action to be taken by the M.S.C.E. ) | |
|---|---|---|---|
| | | पुर्वीची शिक्षासुची | प्रस्तावित शिक्षा सुची |
| १० | एकाच विद्यार्थ्याच्या आसन क्रमांकाच्या दोन उत्तरपत्रिका असल्याचे आढळून आल्यास. | योग्य ती चौकशी करुन संबंधित विद्यार्थ्याची परीक्षेतील संपादणूक रद्द करुन पुढील दोन परीक्षांना बसण्यापासून वंचित करण्यात येईल. | चौकशी करुन संबंधित विद्यार्थ्याची परीक्षेतील संपादणूक रद्द करुन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC) टंकलेखन/ लघुलेखन विषयांच्या पुढील दोन परीक्षांना बसण्यापासून प्रतिबंध करावा. या प्रकरणी पर्यवेक्षक व केंद्रसंचालकलही दोषी आढळल्यास चौकशीअंती पर्यवेक्षकावर व केंद्रसंचालकांवर सेवा शर्ती नुसार शिस्तभंगाची कारवाई करावी. |
| ११ | अधिकृत बॅचला असलेल्या संकेताक्षराची प्रश्नपत्रिका न सोडविता अनधिकृत संकेताक्षराची प्रश्नपत्रिका सोडविलेली असल्याचे निदर्शनास आल्यास | योग्य ती चौकशी करुन संबंधित विद्यार्थ्याची परीक्षेतील संपादणूक रद्द करुन पुढील एका परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करणे. | चौकशी करुन संबंधित विद्यार्थ्याची परीक्षेतील संपादणूक रद्द करुन पुढील दोन वर्षासाठी सर्व विषयांच्या परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करावा. पर्यवेक्षकावर व केंद्रसंचालकांवर सेवा शर्ती नुसार शिस्तभंगाची कारवाई करावी. |
| १२ | टंकलेखन विषयाच्या उत्तरपत्रिकेत विभाग I विभाग II हे प्रश्न अथवा त्या एकूण प्रश्नांपैकी कोणताही एक अथवा दोन प्रश्नांचे उत्तर दोन वेळा सोडविणे. | योग्य ती चौकशी करुन दोषी विद्यार्थ्याची परीक्षेतील संपादणुक रद्द करुन पुढील एका परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करणे. | चौकशी करुन टंकलेखन विषयाच्या विभाग I चे गुणदान नियमानुसार करावे मात्र विभाग II दोनदा सोडविला असल्यास त्या विद्यार्थ्याची चौकशीअंती त्या परीक्षेतील संपादणुक रद्द करावी. पर्यवेक्षकावर त्यांच्या सेवा शर्ती नुसार शिस्तभंगाची कारवाई करावी. |
| १३ | लघुलेखन विषयाच्या उत्तरपत्रिकेत कोरीकृतीनुसार (outlines) भाषांतर केलेले नसणे, कोरीकृती शिसपेन्सिलने न घेणे, कोराकृत्या न काढता पूर्ण शब्द लिहून घेणे, कोराकृत्या घेतांना संशयास्पद खाडाखोड करणे इ. | योग्य ती चौकशी करुन दोषी विद्यार्थ्याची परीक्षेतील संपादणुक रद्द करुन पुढील एका परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करणे. | चौकशी करुन दोषी विद्यार्थ्याची परीक्षेतील संपादणुक रद्द करुन पुढील सर्व विषयांच्या २ परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करणे. मात्र चौकशीसाठी विद्यार्थी गैरहजर राहिल्यास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC) टंकलेखन/ लघुलेखन सर्व विषयांच्या पुढील ४ परीक्षांना बसण्यास प्रतिबंध करणे. |
| १४ | लघुलेखनाच्या उत्तरपत्रिकांच्या हस्ताक्षरात विषयात साम्य असणे, सर्व उत्तरपत्रिकांमधील उत्तरेही एकसारखी आढळून येणे | योग्य ती चौकशी करुन दोषी विद्यार्थ्याची परीक्षेतील संपादणुक रद्द करुन पुढील एका परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करणे. केंद्रसंचालकांचीही चौकशी करुन त्यांनाही जबाबदार धरण्यात यावे. | दोषी विद्यार्थ्याची सखोल चौकशी करुन सदर परीक्षेतील संपादणुक रद्द करुन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC) टंकलेखन/ लघुलेखन सर्व विषयांच्या पुढील ४ परीक्षांना बसण्यास प्रतिबंध करणे. पर्यवेक्षक व केंद्रसंचालकांचीही चौकशी करुन दोषी आढळल्यास त्यांचेवरही सेवा शर्ती नुसार शिस्तभंगाची कारवाई करावी. |

| अ.क्र | चुकांचे स्वरुप (Category) | परीक्षा परिषदेने करावयाची कारवाई( **Action to be taken by the M.S.C.E.** ) | |
|---|---|---|---|
| | | पुर्वीची शिक्षासुची | प्रस्तावित शिक्षा सुची |
| १५ | लघुलेखनाची उत्तरपत्रिका प्रश्नपत्रिकेप्रमाणे हुबेहुबे उतरविलेली असणे. | योग्य ती चौकशीकरुन संबंधित विद्यार्थ्यांची परीक्षेतील संपादणुक रद्द करुन पुढील ३ परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करणे. केंद्रसंचालकांचीही चौकशी करुन त्यांनाही जबाबदार धरण्यात यावे. | प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषी विद्यार्थ्यांची परीक्षेतील संपादणुक रद्द करुन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC) टंकलेखन/ लघुलेखन ४ परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करणे. पर्यवेक्षक व केंद्रसंचालकांचीही चौकशी करुन दोषी आढळल्यास त्यांचेवरही शिस्तभंगाची कारवाई करावी. |
| १६ | परिषदेच्या परवानगीशिवाय विषय/बॅच/ केंद्रबदल करणे. | विद्यार्थ्याची परीक्षेतील संपादणुक रद्द करुन Absent निकाल जाहीर करणे. | विद्यार्थ्याची सदर परीक्षेतील संपादणुक रद्द करावी. |
| १७ | उत्तरपत्रिका फाडलेली आढळणे | | केंद्रसंचालकांकडून खुलासा मागविणे व परिषदेच्या मालमत्तेचे नुकसान केल्याबद्दल त्या विद्यार्थ्यास परीक्षा परिषदेच्या सर्व विषयांच्या परीक्षांसाठी पुढील दोन वर्षे बसण्यापासून प्रतिबंध करावा. |
| १८ | न सोडविलेल्या उत्तरपत्रिकेच्या कोऱ्या भागावर तसेच छापलेल्या भागावर लाल रेषा नसणे. | | पर्यवेक्षक व केंद्रसंचालक यांच्यावर सेवा शर्ती नुसार शिस्तभंगाची कारवाई करावी. |
| १९ | पुर्वी परीक्षा पास असूनही जी.सी.सी. परीक्षेसाठी पुन्हा प्रविष्ट होणे. | | असे निदर्शनास आल्यास त्या विद्यार्थ्याला महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC) टंकलेखन/ लघुलेखन सर्व विषयांच्या पुढील २ परीक्षांसाठी प्रतिबंध करावा. संबंधित विरोधात पोलिस कारवाई करावी. |
| २० | केंद्रसंचालकाच्या परवानगीशिवाय मशिन बदल करणे. | | विद्यार्थ्याची सदर परीक्षेतील संपादणुक रद्द करावी. |
| २१ | उत्तरपत्रिके वर व्हाईटनरचा वापर केलेला आढळणे. | | विद्यार्थ्याची सदर परीक्षेतील संपादणुक रद्द करावी. |
| २२ | उत्तरपत्रिकेस मुखपृष्ठ नसणे किंवा मुखपृष्ठांची अदलाबदल करणे. | | विद्यार्थ्याची सदर परीक्षेतील संपादणुक रद्द करावी. |